व्यंकटेश महाविद्यालयात ‘एक हात मदतीचा’ उपक्रम

‘चला तर मग! एक हात मदतीचा’ या घोषवाक्याखाली श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पूरग्रस्त भागातील लोकांसाठी मदतीचा हात देण्याचे आवाहन करण्यात आले. ‘एक हात मदतीचा’ या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांकडून तांदूळ, गहू, साखर, डाळी, बिस्किटे, कपडे, पादत्राणे तसेच अवधी न संपलेली औषधे व जीवनावश्यक वस्तू जमा करण्याचे आवाहन करण्यात आले. जमा केलेली मदत संबंधित ठिकाणी पाठविण्यात आली. हा उपक्रम राबविन्यासाठी शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. एस. एन. जरंडीकर, राष्ट्रीय सेवा योजना सदस्य डॉ. डी. एस. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. असून २६० किलो तांदूळ पाठवण्यात आला, प्राचार्य डॉ. विजय ए. माने यांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, " आपण एक प्रथम भारताचे सुजान नागरिक आहोत त्यामुळे आपले भारतीय नागरिक ओल्या दुष्काळास तोंड देत असताना आपण सामाजिक बांधिलकी जपत सर्वतोपरी सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वांनी आपापल्यापरीने सहकार्य करावे. " या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व मानवतेची भावना जागृत होईल असेही ते म्हणाले.


श्री व्यंकटेश महाविद्यालय,
इचलकरंजी
राष्ट्रीय सेवा योजना
इचलकरंजी
सारंग दास,इचल.